अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(स्वायत्त महाविद्यालय)

नोटीस क्र. 648

दि. १३/०२/२०२४
14 FEB 2024

# NOTICE

## प्रथम, द्वितीय , तृतीय वर्ष (UG) व डी.टी.एल. या अभ्यासक्रमामधील सर्व विद्यार्थ्यांसाठी मार्च/एप्रिल-२०२४ ऑनलाईन परीक्षा अर्ज भरणेबाबत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा फी परीपत्रक क्र. ३१२/२०१९ , २७/२०२३ व महाविद्यालयीन परीक्षा समितीच्या दि.०३/०२/२०२४ च्या निर्णयानुसार मार्च/एप्रिल-२०२४ ऑनलाईन परीक्षा अर्ज भरणेबाबत कार्यक्रम निर्धारीत केलेला आहे. तरी महाविद्यालयाच्या परीक्षा समितीने निर्धारीत केलेल्या तारखेपूर्वीच विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज व परीक्षा फी ऑनलाईन (www.tccollege.org) भरावी.

- ज्या विद्यार्थ्यांनी २०२३-२०२४ मध्ये पदवीच्या वर्षात प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी तसेच ऑक्टो.-२०२३ च्या परीक्षेत किंवा त्यापूर्वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सेमे.१ ते ६ चे फ्रेश/ बॅकलॉग/रिपीटरचा परीक्षा अर्ज ऑनलाईन भरावा. परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याअगोदर परमनंट रजिस्टर नंबर (PRN) ची नोंद विद्यार्थ्यांने स्वत:कडे करून घ्यावी.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये पदवीच्या प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना यापूर्वी महाविद्यालयाने PRN दिलेले होते. परंतु, विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.२७/२०२३ नुसार विद्यापीठाने नवीन PRN दिलेले आहेत. तरी विद्यार्थ्यांनी नवीन PRN ची नोंद करून ऑनलाईन परीक्षा अर्ज भरावा.
- ज्या विद्यार्थ्यांची प्रवेश घेतेवेळी एल.सी., टी.सी., मायग्रेशन, पात्रताअर्ज , वैद्यकीय तपासणी, शिष्यवृत्ती अर्ज इ. कागदपत्रांची पूर्तता करावयाची राहिली असेल तर ती पूर्ण करावी अन्यथा आपणास वार्षिक परीक्षेचा ऑनलाईन परीक्षा अर्ज भरता येणार नाही.
- बॅकलॉग/रिपीटर ज्या विद्यार्थ्यांचा निकाल सर्टिफिकेट कोर्स पूर्ण न केल्यामुळे अनुत्तीर्ण आलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी सुद्धा ऑनलाईन परीक्षा अर्ज भरावा व आवश्यक तेवढ्या सर्टिफिकेट कोर्सला प्रवेश घेऊन सर्टिफिकेट कोर्स पूर्ण करावेत.

- ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी प्रवेश फी मध्ये सवलत घेऊन प्रवेश घेतलेला होता अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्याअगोदर संपूर्ण प्रवेश फी भरावी.
- सर्व विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाईन परीक्षा अर्ज विना विलंबशुल्काने दि.२०/०२/२०२४ ते दि. २९/०२/२०२४ पर्यंत, विलंबशुल्काने दि. ०१/०३/२०२४ ते दि. १०/०३/२०२४ पर्यंत भरावेत.
- जे विद्यार्थी या कालावधीत ऑनलाईन परीक्षा अर्ज भरू शकणार नाही त्यांचे विशेष विलंबशुल्काने दि.११/०३/२०२४ ते दि.१५/०३/२०२४पर्यंत परीक्षा अर्ज स्विकारले जातील.
- ऑनलाईन परीक्षा अर्ज (Click here for Online Exam Form) भरताना परमनंट रजिस्टर नंबर (PRN) ओळख पत्रावरील अथवा ऑनलाईन प्रवेश घेतेवेळीची माहिती भरावी.
- परीक्षा अर्जामध्ये मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, ई-मेल आयडी, ABC आयडी इ. अचूक नमूद करावेत.
- प्रवेश घेतेवेळी जे विषय प्रवेश अर्जात नमूद केले होते तेच विषय ऑनलाईन प्रक्रियेतील परीक्षा अर्जामध्ये असणार आहेत व तेच विषय घ्यावे लागणार आहेत याची नोंद घ्यावी.
- ऑनलाईन परीक्षा अर्जातील माहिती भरल्यानंतर त्याचठिकाणी ऑनलाईन परीक्षा फी दिसेल व तेथेच (PAY FEE ONLINE ) भरण्याची लिंक असणार आहे. सदर लिंक मधून ऑनलाईन परीक्षा फी त्याचवेळी भरावी.
- ऑनलाईन परीक्षा फी भरल्यानंतर परीक्षा अर्ज डाउनलोड (DOWNLOAD EXAM FORM ) करून त्याची पाटपोट (Back to Back) **प्रिंट काढून स्वत:कडे ठेवावी**. जर परीक्षा अर्जामध्ये काही त्रुटी असेल (उदा. नांव, जन्मदिनांक, पत्ता, ई-मेल, मोबाईलनंबर इ.) तरच **प्रशासनभवनामध्ये जमा करावेत**.
- प्रात्यक्षिक परीक्षा व थेअरी (लेखी) परीक्षासंबंधीचे स्वतंत्र वेळापत्रक महाविद्यालयातील सूचनाफलकावर व संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल.
- ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा अर्ज भरणेविषयी माहिती अथवा काही शंका असल्यास त्यांनी त्वरीत महाविद्यालयाच्या परीक्षा विभागाशी संपर्क साधावा.
- ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्याची सुविधा **ग्रंथालय विभागात नि:शुल्क** देण्यात येत आहे त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

# परीक्षा अर्ज भरण्याची मुदत

**बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी./ बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स)/ बी.बी.ए./ बी.बी.ए.(सी.ए)/ बी.व्होक./डी.टी.एल.**

| विलंब शुल्काशिवाय परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत | विलंब शुल्क रू. १६५/- घेवून परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत | विशेष विलंब शुल्क रू. १,१६५/- घेवून परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत | प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होण्याची संभाव्य तारीख | लेखी परीक्षा सुरू होण्याची संभाव्य तारीख |
|---|---|---|---|---|
| दि. २०/०२/२०२४ ते दि. २९/०२/२०२४ | दि. ०१/०३/२०२४ ते दि.१०/०३/२०२४ | दि. ११/०३/२०२४ ते दि.१५/०३/२०२४ | दि.०४/०४/२०२४ ते ते १६/०४/२०२४ | बॅकलॉग<br>दि.०१/०४/२०२४ ते दि. १३/०४/२०२४<br>रेग्युलर<br>दि.१८/०४/२०२४ ते दि. २०/०४/२०२४ |

# परीक्षा फी खालीलप्रमाणे

| अ. क्र. | वर्ग | परीक्षा फी | कॅप फी | गुण पत्रक फी | पासिंग सर्टि. फी | परीक्षा अर्ज फी | एकूण परीक्षा फी | बॅकलॉग प्रत्येक विषयाकरीता परीक्षा फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एफ.वाय./एस.वाय.बी.ए./बी.कॉम. | ३७५ | ९५ | ९५ | ०० | २५ | ५९० | ६५ |
| २ | एफ.वाय./एस.वाय.बी.एस्सी. | ५६० | ९५ | ९५ | ०० | २५ | ७७५ | ५५ |
| ३ | एफ.वाय./एस.वाय.बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स ) | ५६० | १६० | १६० | ०० | ३५ | ९१५ | ५० |
| ४ | एफ.वाय.बी.बी.ए./ बी.बी.ए. (सी.ए.) | १४८५ | १६० | १६० | ०० | ३५ | १८४० | २४० |
| ५ | एस.वाय.बी.बी.ए./ बी.बी.ए. (सी.ए.) | १४८५ | १६० | १६० | ०० | ३५ | १८४० | २४० |
| ६ | एफ.वाय./एस.वाय.बी.व्होक. | १४८५ | १६० | १६० | ०० | ३५ | १८४० | २४० |
| ७ | टी.वाय.बी.ए./बी.कॉम. | ३७५ | ९५ | ९५ | ९५ | २५ | ६८५ | ६५ |
| ८ | टी.वाय. बी.एस्सी. | ५६० | ९५ | ९५ | ९५ | २५ | ८७० | ६५ |
| ९ | टी.वाय.बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) | ५६० | १६० | १६० | १६० | ३५ | १०७५ | ६५ |
| १० | टी.वाय.बी.बी.ए./ बी.बी.ए.(सी.ए.) | १४८५ | १६० | १६० | १६० | ३५ | २००० | २४० |
| ११ | टी.वाय./एस.वाय.बी.व्होक. | १४८५ | १६० | १६० | १६० | ३५ | २००० | २४० |
| १२ | डी.टी.एल. | ५६० | १६० | १६० | १६० | ३५ | १०७५ | १३५ |

- प्रोजेक्ट चा विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट फी स्वतंत्र भरावी लागेल.
- गुणपत्रक फी प्रत्येक वर्षांकरीता व कॅप फी प्रत्येक सेमेस्टर करिता स्वतंत्र भरावी लागेल.
- **निर्धारीत मुदतीनंतर ऑनलाईन परीक्षा अर्ज उपलब्ध असणार नाहीत. तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन भरून परीक्षा फी ऑनलाईन भरलेली आहे, अशा विद्यार्थ्यांचीच परीक्षा घेतली जाईल, याची संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

प्रबंधक

महाविद्यालयीन उप-परीक्षा अधिकारी

महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी

प्राचार्य

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्रत:
१) सर्व उप-प्राचार्य
२) सर्व विभागप्रमुख
३) ग्रंथपाल
४) विद्यार्थी सूचनाफलक
५) प्रशासनभवन सूचनाफलक

D:\sddeokar\sddeokar\Admn\ADM 2023-2024\Exam Notice Oct-2023 & Mar 2024.docx